## सामान्य प्रशासन विभाग क्र.1
## जिल्हा परिषद, सोलापूर

जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१४/११४५/२३ सोलापूर दि. १८/०९/२०२३

# निविदा सुचना

जिल्हा परिषद, मुख्यालयातील कार्यरत असलेली अंतर्गत सी.सी.टी.व्ही कार्यप्रणाली अनुषंगिक सर्व यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (Non Comprehensive AMC) करावयाचा असल्याने मोहोरबंद लिफाफामध्ये दरपत्रक मागविणेत येत आहे. तेव्हा इच्छुक पुरवठाधारकांनी दर व इतर सर्व समावेक्षक कर सेवा कर/वस्तु व सेवा शुल्क कर यांचा तपशीलवार उल्लेख करावा. अन्यथा प्राप्त दर हे सर्वसमावेक्षक दर धरले जातील. तसेच न्युनतम दर असलेल्या अथवा नियुक्त केलेल्या मक्तेदरास /संस्थेस सोबत जोडलेले अटी व शर्ती मान्य करणे बंधनकारक राहील.

**वार्षिक देखभाल दुरुस्ती करिता खालीलप्रमाणे दरपत्रके मागविणेत येत आहे.**

| अ.क्रं | तपशील | दर येथे नमुद करावा | इतर कर येथे नमुद करावा |
|---|---|---|---|
| १) | **जि.प मुख्यालयामधील कार्यरत सर्व सी.सी.टी.व्ही कार्यप्रणाली अनुषंगिक सर्व यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार (Non Comprehensive AMC)**<br>टिप- कृपया सोबत जोडलेल्या अटी व शर्ती लक्षात घ्याव्यात. | | |

| Sr. No | Product Discription | Qty |
|---|---|---|
| 1 | Hikvision 2 Megapixel Cube Camera | 83+ |
| 2 | Hikvision Bullet 720P Camera | 16+ |
| 3 | HIKVISION 7P16NI-E2 NVR | 4 |
| 4 | TELEVISIONS VU | 1 |
| 5 | SECUREYE 8 PORT POE WITH UPLINK | 10 |
| 6 | SECUREYE 24 PORT POE WITH UPLINK | 2 |
| 7 | Other equpment wiring, comnnector, rack, hard disk, switch, casing caping wiring etc. | - |

सदरची दरपत्रके हे दि. २५/०९/२०२३ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने बंद लिफाफ्यातुन पाठवावे व लिफाफ्यावर **सी.सी.टी.व्ही कार्यप्रणाली देखभाल दुरुस्ती दरपत्रके** असा स्पष्ट अक्षरात उल्लेख करावा.

स्थळ प्रतीवर स्वाक्षरी

XXX/-स्वाक्षरी
(स्मिता म. पाटील)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा)
जिल्हा परिषद, सोलापूर

प्रत - १) कार्यालयीन नोटीस बोर्डावर.
२) ई-मेल आय.टी सेल -जिल्हा परिषद सोलापूर या सांकेतिक स्थळावर प्रसिध्दीसाठी.

# निविदेच्या नियम व अटी

१) पुरवठाधारकांचे/मक्तेदारांचे वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST) रजीस्ट्रेशन सट्रीफिकेट असणे आवश्यक.

२) निविदाधारकाने स्वतःच्या अटी (तांत्रिक बाब व आर्थिक बाब असलेली कोणतीही अट) घालून सादर केलेली निविदा मान्य करण्यात येणार नाही.

३) मक्तेदारांने जिल्हा परिषदमधील कार्यरत असलेले एकूण ९९+ अधिक सी.सी.टी.व्ही कॅमेरे व तद्अनुषंगिक उपकरणे (POE स्वीच, NVR, Cabling, Cantroling etc.) तसेच दरकराराच्या अवधीमध्ये जोडण्यात आलेले नवीन सी.सी.टी.व्ही कॅमेरे व तद्अनुषंगिक यंत्रणा हे सुद्धा वार्षिक देखभाल दुरुस्ती करारामध्ये समावेश असल्याने अथवा या अटीवर करणेबंधनकारक राहील. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

४) मक्तेदारांस सी.सी.टी.व्ही कार्यप्रणाली दुरुस्तीकरिता कळविले असता त्यांनी २४ तासांच्या आत येवून यंत्रणेची पाहणी करणे बंधनकारक राहील. म्हणजेच २४ तासांच्या आत सदरची यंत्रणा दुरुस्त करणे संबंधित मक्तेदारास बंधनकारक राहील. अन्यथा लागणाऱ्या विलंबास र.रु ५००/ प्रती दिन प्रमाणे दंड आकारला जाईल. सदरचा दंड अंतिम देयक अदा करताना कपात केला जाईल.

५) तसेच यंत्रणादुरुस्तीबाबत आवश्यक साहित्याचा/साधनांचा तपशील सामान्य प्रशासन विभाग क्रं.१ या कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे सुचनेनुसार आवश्यक साहित्याचा पुरवठा करावयाचा आहे.

६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा) यांचे वेळोवेळी सुचनेनुसार सी.सी.टी.व्ही फुटेज काढणेची जबाबदारी ही मक्तेदाराची राहील.

७) जर एखादे दुरध्वनी संबंधित साहित्य/ सामुग्री या कार्यालयाने खरेदी केली असता ती कार्यान्वित करणेची संपूर्ण जबाबदारी ही मक्तेदारांचीच राहील. त्यासाठी त्यांना कोणतेही अतिरिक्त सेवाशुल्क दिले जाणार नाही.

८) जि.प अंतर्गत सी.सी.टी.व्ही देखभाल करिता दरवेळी पत्रव्यवहार करणे शक्य नसलेमुळे मक्तेदांस त्यांचेकडील भ्रमणध्वनी क्रंमांक कळविणे बंधनकारक राहील व सी.सी.टी.व्ही कार्यप्रणाली संबंधित बिघाड /नादुरुस्तीबाबत मक्तेदारांस मोबाईल/टेलिफोन द्वारेच कळविले जाईल. याची नोंद घ्यावी.

९) एखादे वेळी जर मक्तेदारांने विहित वेळेमध्ये काम केले नाही तर तेच काम इतर मक्तेदारांकडून करुन घेतले जाईल व होणारा खर्च हा मक्तेदारांच्या देयकांमधून कमी केला जाईल.

१०) दर मान्य झाल्यास नंतर कोणत्याही प्रकारची वाढ देण्यात येणार नाही.

११) दंडात्मक कार्यवाहीचे सर्व अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांना राहतील. केलेल्या कार्यवाहीचा अंतिम निर्णय पुरवठाधारकांस पाळणे बंधनकारक राहील.

१२) निविदेतील अटी व शर्तीचे पालन करणे आपणास बंधनकारक आहे. निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा आपणांकडून भंग झाल्यास पुरवठाधारकांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

१३) प्रचलित नियमानुसार देयकातून आयकर वजा/कपात करण्यात येईल.

१४) निविदा प्रक्रियेमध्ये काही अडचणी/ त्रुटी आढळून आल्यास त्याबाबतचे सर्व अधिकार हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.) यांचेकडे राखून ठेवले आहेत.

१५) पुरवठाधारकांने सदर निविदेच्या अटी व शर्ती मान्य असलेचे प्रमाणपत्र सादर करावे.